१७६

केवळ कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकरीता

सह महापालिका आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. टीजीओ/८४४
दिनांक :- २२।०५।२०१२.

## कार्यालय परिपत्रक

विषय :- मिळकतींची कर आकारणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

कर आकारणी व कर संकलन खात्यामार्फत पुणे महानगरपालिका हद्दीतील ज्या मिळकतींची कर आकारणी झाली आहे. अशा मिळकतींकडून दरवर्षी मिळकतकर वसूल करणे, तसेच आकारणी न झालेल्या मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करून अशा मिळकती मिळकत कराच्या जाळ्यात आणणे, या महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाच्या बाबी आहेत.

वरील बाबींच्या अनुषंगाने कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आमचे मार्फत साप्ताहिक बैठक आयोजित करण्यात येत असते. सदर बैठकीमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे त्वरीत निकाली काढणेबाबत यापूर्वीही वारंवार सूचना दिलेल्या आहेत. विशेषत: प्रलंबित भोगवटापत्र, नागरिकांनी आकारणीसाठी दाखल केलेले पीटी-१ अर्ज, याशिवाय दैनंदिन तपासणीमध्ये आढळून आलेल्या आकारणी न झालेल्या मिळकतींची आकारणी याबाबत तपशिलवारपणे आढावा घेण्यात येतो.

नवीन मिळकतींची कर आकारणी करताना केवळ भोगवटापत्राप्रमाणे जागेवर पाहणी करून किंवा मिळकतधारकांनी केलेल्या अर्जामधील तपशिलाबाबतच कार्यवाही केली जाते. वास्तविक आकारणी करावयाची इमारत, तसेच आजूबाजूचा ले-आऊट (परिसर) यांची प्रत्यक्ष जागेवर पाहणी व शहानिशा करून आकारणी न झालेली सर्वच क्षेत्राची आकारणी होणे ही अत्यंत महत्वाची जबाबदारी विभागीय निरीक्षक व पेठ निरीक्षक यांची आहे.

असे असताना देखील आमच्या असे निदर्शनास आले आहे की, मिळकतीची कर आकारणी केलेले "ए फॉर्म" स्वाक्षरीसाठी आल्यानंतर त्याची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम वाढली आहे. यावरून वर नमूद केल्याप्रमाणे वारंवार सूचना देऊनही मिळकतींच्या कर आकारणीच्या कामकाजामध्ये संबंधीतांकडून योग्य ती दक्षता घेतली जात नाही. पर्यायी महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

सबब या परिपत्रकाव्दारे पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की, मिळकतीची कर आकारणी करताना सर्व बाबी योग्य प्रकारे तपासून मिळकतींची कर आकारणी करण्याच्या दक्षता घावी, जेणे करून पुणे महापालिकेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. त्याचप्रमाणे आपापल्या कार्यक्षेत्रातील आकारणी न झालेली एकही मिळकत आपापल्या कार्यक्षेत्रात शिल्लक राहणार नाही, या दृष्टीने सर्व

संबंधीतांनी सर्वतोपरी दक्षता घेऊन दैनंदिन पाहणी करून आकारणी न झालेल्या मिळकती शोधून त्यांची आकारणी करण्याची दक्षता घ्यावी.

तसेच मिळकतीची आकारणी केल्यानंतर संबंधीत मिळकतधारकास स्पेशल नोटीस दिल्यानंतर कायद्यातील तरतूदीनुसार योग्य मुदतीनंतर अशा मिळकतीस मिळकत कराची बिले देणे आवश्यक आहे. अथवा स्पेशल नोटीस अमान्य केल्यास त्याबाबत विनाविलंब सुनावणी होऊन त्याप्रमाणे निर्णय प्रक्रिया पूर्ण होऊन बिले देणे आवश्यक आहे. मात्र असे असलेतरी आकारणी विभागाकडून अनेक स्पेशल नोटीसा प्रलंबित असल्याचे आढावा बैठकीमध्ये निदर्शनास आलेले आहे. याबाबतही आकारणी विभाग प्रमुख, सर्व पेठ लेखनिक व विभागीय निरीक्षक यांना सूचना देण्यात येतात की, अशा प्रकारे स्पेशल नोटीस व मिळकतीची आकारणी प्रलंबित राहणार नाही व अशी सर्व प्रकरणे दि. ३१/५/२०१२ पूर्वी निकाली काढण्याची दक्षता घ्यावी.

22/5/12

(विलास कानडे)
सह महापालिका आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका.

प्रत:-१. सर्व सहा.कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
२. आकारणी विभाग प्रमुख,
३. [redacted] विभाग प्रमुख,
४. सर्व विभागीय निरीक्षक व पेठ निरीक्षक